**MHKO100009112025**

नियमीत दरखास्त क्र.३३/२०२५ निशाणी १२ वर आदेश
**(**महालक्ष्मी पतसंस्था वि**.** रामय्या पुजारी**)**

प्रस्तुतचा अर्ज दरखास्तदार यांनी पोलीस संरक्षण मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, बेलीफ, पंच यांच्यासह दरखास्तदार जंगम माल जप्तीसाठी वि.प.क्र.१ यांच्या घरी गेले होते त्यावेळी त्यांचे कुटूंबासह हजर होते. जंगम माल ताब्यात घेत असताना वि.प.क्र.१ यांनी विरोध केला व धमकीची भाषा केली. त्यामुळे जंगम माल जप्त करता आला नाही. सबब दरखास्तदार यांना जंगम माल जप्ती वेळी पोलीस संरक्षणाची आवश्यकता आहे. दरखास्तदार नियमाप्रमाणे पोलीस भत्ता भरण्यास तयार आहेत. तरी एक दिवसासाठी पोलीस संरक्षण मिळावे.

२. वि.प. यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही.

३. दरखास्तदार यांनी मुळ दरखास्त रक्कम रू.५९,२७५.०० च्या वसुलीकरीता दाखल केली आहे. मे. कोर्टाचे आदेशाप्रमाणे निशाणी १० प्रमाणे पैशासंबंधीच्या हुकूमनाम्याची अंमल बजावणी करण्यासाठी प्रतिवादीच्या कब्जातील जंगम संपत्तीवर जप्ती आण्यासाठी अधिपत्र काढण्यात आले. त्यानुसार कोर्ट बेलीफ, पंच, दरखास्तदार तर्फे श्री. चिटणीस असे मिळून वॉरंट हुकूमात नमुद असले वि.प.क्र. १ यांच्या राहत्या घराजवळ आले असता तिथे वि.प.क्र.१ प्रत्यक्ष हजर होते. त्यांनी तोंडी वॉरंट हुकूमाची समज देवून वॉरंटमध्ये नमूद रक्कम भरण्यास सांगितले असता त्यांनी त्यास नकार दिला. त्यानंतर वि.प.क्र.१ यास घरातील जप्तीस पात्र जंगम माल दाखविण्यास सांगितले असता व त्यांच्या घरातील जंगम माल जप्त करण्याचा प्रयत्न केला असता वि.प.क्र.१ यांनी साहित्य जप्त करू देणार नाही व हातही लावू देणार नाही असे मोठमोठयाने ओरडून सांगू लागले. तसेच माझा या रक्कमेशी संबंध नाही असे म्हणून लागल्याने त्यांनी कोणतीही जंगम माल जप्त केला नाही असा बेलीफ रिपोर्ट अभिलेखावर दाखल आहे.

४. आज रोजी वि.प. व त्यांचे तर्फे विधीज्ञ यांना वारंवार पुकारले असता ते गैरहजर आहेत. त्यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही. तसेच दरखास्तदार यांची रक्कम भरण्यासाठी कोणतीही तरतुद केली नाही. अशा परिस्थितीत दरखास्तदार यांची रक्कम वसुल होण्याचे दृष्टीने दरखास्तदार मागणी करत असल्याप्रमाणे पोलीस संरक्षण देणे आवश्यक आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

आदेश

१ अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. एक पोलीस शिपाई, गडहिंग्जल पोलीस स्टेशन यांची वि.प.क्र.१ यांची जंगम मालमत्ता जप्त करण्याचे कामी एक दिवसासाठी नियुक्ती करण्याची विनंती मंजूर करण्यात येते.

३. दरखास्तदार यांनी आवश्यक ती फी गडहिंग्लज पोलीस स्टेशनमध्ये भरावी.

४. तसे पत्र गडहिंग्लज पोलीस स्टेशन यांना देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by
DHANASHRI
MAHADEV PAWAR
Date: 2025.12.22
15:44:41 +0530

दिनांक २०.१२.२०२५
गडहिंग्लज

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज